स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

GOVERNMENT OF MAHARASHTRA

# विभागीय आयुक्त कार्यालय,पुणे
## विकास आस्थापना-शाखा

पत्ता:-विभागीय आयुक्त कार्यालय,विधान भवन,पुणे ४११००१

Gmail-est.divcommpune@gmail.com

कार्यालयीन दुरध्वनी ०२०.२६३६२७६३

---

मविसे/आस्थापना/सेजेष्ठता/सहा.प्रशा.अधिकारी /२०२३ पुणे दिनांक- 02/03/२०२३

ज्ञापन-

विषय- महाराष्ट्र विकास सेवा गट-ब मध्ये पदोन्नती करिता जिल्हा सेवा वर्ग ३ मधील सहाय्यक प्रशासन अधिकारी पदाची यांची विभागीय स्तरावरील दि.०१.०१.२०२३ ची तात्पुरती अतिरिक्त (Provisional additional) जेष्ठता यादी प्रसिद्दीबाबत.

सामान्य प्रशासन विभागाकडील निर्णय क्र एसआरवी/२०११/प्र.क्र.२९४/१२/दिनांक २१/१०/२०११ अन्वये जेष्ठता यादया प्रसिध्द करणे बाबत निर्देश दिलेले आहेत. त्यातील निर्देशानुसार महाराष्ट्र विकास सेवा गट ब मध्ये पदोन्नती करिता जिल्हा सेवा वर्ग ३ मधिल सहाय्यक प्रशासन अधिकारी यांची विभागीय स्तरावरील दि.०१.०१.२०२३ रोजीची तात्पुरती अतिरिक्त (Provisional additional ) सेवा जेष्ठता यादी प्रसिद्व करण्यांत येत आहेत. दि.०१.०१.२०२३ रोजीची तात्पुरत्या अतिरिक्त सेवा जेष्ठता यादीची प्रत सोबत जोडण्यांत येत आहे.सदरची यादी प्रसिध्द करतेवेळी खालील बाबी विचारात घेण्यांत आलेल्या आहेत.

१) महाराष्ट्र विकास सेवा वर्ग १ व वर्ग २ मध्ये नियुक्ती संदर्भात प्रथमत: नियम सन १९७३ (राजपत्र १० ऑगष्ट १९७३ मध्ये प्रसिद्व करण्यांत आले व त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा झाल्या. दि. ६ जून १९७९ व दि. ७ जून १९८४ च्या सुधारणे नुसार नियम ६(५) मध्ये उच्चतम पदावर तीन वर्षे सेवा झाली असल्यांस कर्मचारी पदोन्नतीसाठी पात्र ठरत असल्यांने सरळसेवेने सदर पदांवर भरती झालेल्या व तीन वर्षे पुर्ण सेवा झालेल्या कर्मचा-यांची नावे सेवा जेष्ठता यादीत समाविष्ठ करण्यांत आलेली आहेत.

२) शासन अधिसूचना दिनांक २४ मे १९९९ मधील नियम ३ मध्ये नमूद केल्यानुसार विहीत कालावधीमध्ये व संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास जेष्ठता गमावण्या संदर्भातील तरतुदी विचारात घेतलेल्या आहेत.

३) सदरची यादी ही जिल्हा परिषदेच्या सेवा जेष्ठता यादयावरुन तयार करणेत येत असल्याने तेथील जेष्ठता यादीतील स्थान विचारत घेऊन त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांत आलेली आहे. उदा. एखादा कर्मचारी आंतर जिल्हा बदलीने आला असल्यांस तो सेवेत कनिष्ठ होतो ही बाब विचारात घेण्यांत आलेली आहे.

४) महाराष्ट्र विकास गट ब मध्ये पदोन्नतीसाठी किमान शैक्षणिक अर्हताही एसएससी अथवा समकक्ष परिक्षा उत्तीर्ण अशी असल्यांने व सदर संवर्गातील निम्नतम पदावर रुजू होणेसाठी एसएससी अथवा समकक्ष उत्तीर्ण अशी अट असल्यांने शैक्षणिक अर्हतेच्या रकान्यांचा समावेश करण्यांत आलेला नाही.

पुणे विभागातील जिल्हा परिषदांकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे सदरच्या तात्पुरत्या अतिरिक्त संयुक्त जेष्ठता यादया प्रसिध्द करण्यांत येत आहेत. सदरच्या तात्पुरत्या अतिरिक्त संयुक्त जेष्ठता यादया हया संबंधित जिल्हा परिषदेने त्यांचेकडे कार्यरत असलेल्या सर्व सहाय्यक प्रशासन अधिकारी यांचे निदर्शनास आणून त्यांच्या दिनांकीत स्वाक्षरी घेण्यांत येवून आपले दप्तरी ठेवाव्यात. सदरच्या यादीतील कोणत्याही बाबी संबंधात कर्मचा-यांच्या काही हरकत असल्यास योग्य त्या पुरावा कागदपत्रासह सदरच्या हरकती संबंधित कर्मचारी यांनी दि20/03/२०२३ पर्यत संबंधित जिल्हा परिषदांकडे सादर कराव्यात. सहाय्यक प्रशासन अधिकारी यांनी हरकती

परस्पर या कार्यालयांस दाखल करु नयेत. सदर हरकतींचा विचार केला जाणार नाही अथवा दखल घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. प्राप्त झालेल्या हरकतींवर संबंधित जिल्हा परिषदेच्या उप मुख्य कार्यकारी अधिकारी साप्रवि यांनी संबंधित विभागाच्या समन्वयाने सर्व हरकती तपासून मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्पष्ट अभिप्रायासह व योग्य त्या कागदपत्रांच्या पुराव्यासह या कार्यालयाकडे दि.३१/०३/२०२३ पर्यत मुदतीत सादर करावयात.आपल्या जिल्हा परिषदेकडील माहिती निरंक असल्यास तसे प्रमाणपत्र सादर करावे.

सदरच्या सेवा जेष्ठता यादया जिल्हा परिषदेने त्यांच्या जिल्हयाच्या माहितीच्या संकेत स्थळावर प्रसिद्ध करावयांत.

सही/xxx
(सौरभ राव)
विभागीय आयुक्त,पुणे
पुणे,विभाग पुणे

स्थळप्रतिवर मा.विभागीय आयुक्त सो यांची स्वाक्षरी असे

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी ,
जिल्हा परिषद पुणे / सातारा / सांगली / सोलापूर/ कोल्हापूर

(राहुल साकोरे)
उपआयुक्त,(आस्थापना)
पुणे,विभाग पुणे

विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग,पुणे

महाराष्ट्र विकास सेवा गट-ब चे पदोन्नतीस पात्र असणा-या जिल्हा सेवा वर्ग ३ (सहाय्यक प्रशासन अधिकारी ) या संवर्गाची दिनांक ०१.०१.२०२३ चे यादीत नाव समाविष्ठ करणेबाबतची तात्पुरती अतिरिक्त जेष्ठता यादी

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे संपुर्ण नाव | जिल्हा | जन्मदिनांक | नियुक्तीचा मार्ग (सरळसेवा/ पदोन्नती) | सध्याच्या पदावरील रुजु दिनांक | सेवा जेष्ठतेचा दिनांक / जेष्ठतेचा मानीव दिनांक रकाना क्र.०६ पेक्षा वेगळा असल्यास | जातीचा प्रवर्ग | प्रवर्ग (नियुक्तीनंतर प्रवर्ग बदलला असल्यास त्याचा दिनांक | जात पडताळणी झाली आहे किंवा कसे? (होय/नाही) | सेवा प्रवेशोत्तर परिक्षा उत्तीर्ण अथवा सुट मिळालेचा दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ |
| १ | श्री.धनजय कृष्णा कदम | सातारा | २५.०४.१९७७ | पदोन्नती | २२.०४.२०१५ | - | इ.मा.व. | - | होय | उत्तीर्ण | ३०.०४.२०३५ | |
| २ | श्री.शशिकांत मल्लिकार्जुन नरगिडे | सोलापूर | १४.०७.१९६७ | पदोन्नती | २०.१२.२०१८ | - | वि.मा.प्र. | - | होय | उत्तीर्ण | ३१.०७.२०२५ | |
| ३ | श्री.शिवप्रसाद यशवंत कुलकर्णी | सातारा | १६.०७.१९७२ | पदोन्नती | ०५.०८.२०१९ | - | खुला | - | लागू नाही | उत्तीर्ण | ३१.०७.२०३० | |
| ४ | श्री.श्रीनिवास मारुती पाटील | सातारा | ०१.०६.१९६८ | पदोन्नती | ११.०९.२०१९ | - | खुला | - | लागू नाही | उत्तीर्ण | ३१.०५.२०२६ | |
| ५ | श्री.रामचंद्र शामराव घाग | कोल्हापूर | ०१.०६.१९६८ | पदोन्नती | १३.०९.२०१९ | - | भ.ज.ब. | - | होय | उत्तीर्ण | ३१.०५.२०२६ | |
| ६ | श्री.भालचंद्र विनायक माने | कोल्हापूर | ०५.०२.१९६७ | पदोन्नती | २७.११.२०१९ | - | अनु.जाती | - | होय | उत्तीर्ण | २८.०२.२०२५ | |
| ७ | श्रीम.उज्ज्वला रामचंद्र पिसे | पुणे | १६.०३.१९६७ | पदोन्नती | ०१.०१.२०२० | - | इ.मा.व. | - | होय | उत्तीर्ण | ३१.०३.२०२५ | |
| ८ | श्री.पोपट रामचंद्र कुंभार | पुणे | १५.०४.१९८० | पदोन्नती | ०१.०१.२०२० | - | इ.मा.व. | - | होय | उत्तीर्ण | ३०.०४.२०३८ | |

स्थळप्रतिवर मा.विभागीय आयुक्त सो यांची स्वाक्षरी असे

सही/xxx
(सौरभ राव )
विभागीय आयुक्त,पुणे
पुणे विभाग,पुणे

(राहूल साकोरे)
उपआयुक्त,(आस्थापना)
पुणे,विभाग पुणे